**जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील फुलंब्री, पैठण, वैजापूर, गंगापूर, कन्नड व सिल्लोड तालुक्यातील एकूण १३ वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक १५/०३/२०२४ रोजी सकाळी ११:३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

.................................................................................................................................................

जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील फुलंब्री, पैठण, वैजापूर, गंगापूर, कन्नड व सिल्लोड तालुक्यातील एकूण १३ वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक १५/०३/२०२४ रोजी सकाळी ११:३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-१२७/२०२४ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २४०३१२- एफटीएस-००७४ दि. १२/०३/२०२४ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. **श्री. विनोद खिरोळकर,** : अध्यक्ष
निवासी उप-जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.

२. **श्री. सुजित ढोलम,** : सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर.

३. **श्री. दिपक बनसोड,** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, छत्रपती संभाजीनगर.

श्री. दिपक बनसोड, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रस्तावित केलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील फुलंब्री, पैठण, वैजापूर, गंगापूर, कन्नड व सिल्लोड तालुक्यातील १३ वाळुघाटाबाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी आपण येथे जमलो आहोत.तपशील खालीलप्रमाणे-

| **रेती / वाळू घाटाचे नाव** | **तालुक्यांमधील वाळू / रेती घाटांची संख्या** | तालुका |
|---|---|---|
| वाणेगांव (खु. बु.) | ०१ | ता. फुलंब्री |
| हिरडपुरी | ०१ | ता. पैठण |
| लासुरगांव-शहजतपूर, झोलेगांव, बाभुळगांव गंगा | ०३ | ता. वैजापुर |

| | | |
|---|---|---|
| पेंडापूर, भालगांव, सनव, आगाठाण | ०४ | ता. गंगापुर |
| देवळी | ०१ | ता. कन्नड |
| के-हाळा, भवन/चिंचखेडा, ऊफळी | ०३ | ता. पैठण |
| | एकूण = १३ | |

सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास महाराष्ट्र शासनाची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोकसुनावणी घेणे आवश्यक आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचा छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. ०६/०२/२०२४ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या परवानगीने आजची लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दिं. १५/०३/२०२४ वेळ- सकाळी ११.३० वा. निश्चित करण्यात आली. सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दि. १४/०२/२०२४ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
२. जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
३. जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर.
४. जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.
५. तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, पैठण, गंगापूर, सिल्लोड, वैजापूर व कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.
६. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, फुलंब्री, पैठण, गंगापूर, सिल्लोड, वैजापूर व कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.
७. ग्रामपंचायत कार्यालय, वाणेगांव (खु.बु.), ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर.
८. ग्रामपंचायत कार्यालय, हिरडपुरी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.
९. ग्रामपंचायत कार्यालय, लासुरगांव-शहजतपूर, झोलेगांव, बाभुळगांव गंगा, ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.
१०. ग्रामपंचायत कार्यालय पेंडापूर, भालगांव, सनव, आगाठाण, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.
११. ग्रामपंचायत कार्यालय,देवळी, ता.कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय, के-हाळा, भवन/चिंचखेडा, ऊफळी ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.
१३. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्लॉट न. ए-४/१, एमआयडीसी, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर.
१४. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट न. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर.
१५. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटुंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
१६. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

१७. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमूद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मुदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे एकही सूचना/आक्षेप लेखी स्वरूपात आजपर्यंत प्राप्त झालेले नाहीत. तसेच त्यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, अजूनही आपले काही आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर ते आपण प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर विचारावेत. तदनंत त्यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार डॉ. प्रशीक शुक्ला, मे. एनव्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा. लि., नागपूर यांनी प्रकल्पाबददल तालुकानिहाय विविध मुद्दायांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदुषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इ. समावेश होता. छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील फुलंब्री, पैठण, वैजापूर, गंगापूर, कन्नड व सिल्लोड तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळुघाटासाठी पर्यावरणविषयक मंजुरी साठी अर्ज केलेला आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, सदर वाळूघाटावर वाळु उपसा करण्यासाठी कुदळ, फावडे, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळु उत्खनन केले जाईल. कुठल्याही मशिनरीचा वापर केला जाणार नाही. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळु वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. फक्त टॅक्टर ट्रॉली द्वारे नदीपात्रातून वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकून करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळु वाहतूक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळु उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमिनीचे पर्यावरण समतोल राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेतल्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपण विकसित केले जाईल. खाणीमध्ये काम करणा-यांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. तालुक्यातील वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

०१. <u>ता. फुलंब्री :-</u>

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | वानेगांव लगतचे उत्तरेकडील गट न. १७७, १७८, १७९, २८०, १८१, १८२, १८३, १८४ दक्षिणेकडील १६७, १६६, १६५, १६४, १६३, १६२, १६१, १९, १८ | १.५८ | ३८९६ |

०२. ता. पैठण:-

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | हिरडपुरी लगतचे गट नं. १९१, १९२ | ३.६ | १२७२१ |

०३. ता. वैजापुर:-

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | लासुरगांव लगतचे गट नं. २०७, २०६, २१६, २१७, २१९<br>शहजतपुर लगतचे गट नं. १२६, १२७ | १.१५ | ४०८१ |
| ०२ | झोलेगाव लगतचे गट न. २, ११३, ११४ | १.०१ | ३५७६ |
| ०३ | बाभुळगांव गंगा लगतचे गट न. १३८, १३९, १४०, १४१, १४२, १४३, १४७, १४८ | ४.८ | १६९६१ |

०४. ता. गंगापुर:-

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | पेंडापुर गांव लगतचे गट नं. ७८, ८०, ८६ | १.०५ | ३७१० |
| ०२ | भालगांव लगतचे गट नं. १८, १९, २०, २२, २३, २४ | २.१ | ७४२० |
| ०३ | सनव गांवठाण गट नं. ११८, ११७, ११०, १०९, १०५, १०४, १०३, १०२ | १.८ | ९५४० |
| ०४ | आगाठाण गांवलगतचे गट न. १२० | १.२ | ४२४० |

०५. ता. कन्नड:-

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | देवळी गांव लगतचे गट नं. २७, २६, २५, २३, २४, २२, ०९, ०८, ०७ | १.२५ | ६६२५ |

०६. ता. सिल्लोड:-

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | के-हाळ गांवलगतचे गट न. ५५४, ५५५, ५५६, ५५७, ५६८, ५६९, ५२६ | १ | ३५३३ |
| ०२ | भवनलगतचे गट न. १८१, २२१, २२२, २३१, २३३, २३४, २३५, २३६, २००, १९० चिंचखेडागांवालगतचे गट न. २१, २२, ३४, ३५, ३६ | १.२१ | ४२७६ |
| ०३ | उफळी गावलगतचे गट न. १६३, १६०/२, १६०/३, ११६, ११७, १२१, १२३, १२४, १३१, १३३, १३४, १३५, १४०, १३९, १३७ | १.६ | ३९५७ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. विनोद खिरोळकर, निवासी उप-जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी यांनी उपस्थितांना सांगितले की, सदरच्या वाळूघाटाचे सादरीकरण झालेले आहे तसेच सदरच्या प्रकल्पाची माहिती व पूस्तिका अगोदरच आपल्याला दिलेले होते. सदरच्या वाळूघाटाबाबत पर्यावरण विषयक प्रश्न, लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात, जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल, असे नमूद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे, अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील फुलंब्री, पैठण, वैजापूर, गंगापूर, कन्नड व सिल्लोड तालुक्यातील सहभागी लोकांनी प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्रं | केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव. | प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन/उत्तर. |
|---|---|---|
| १. | **श्री. जनार्धन अशोक काकडे, रा. झोलेगाव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर** यांनी सांगितले की, आमच्या गावात मागील चार वर्षापासून वाळूचे टेंडर घेणे चालू आहे. परंतू याचा गावाला कसलाही फायदा/मोबदला मिळालेला नाही. अगोदरच शिवना नदीचे पाणी कमी झालेले आहे वाळूचा लिलाव झाल्यास सदर पाण्याची पातळी अजूनच कमी होईल व पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच वाळू वाहतूकीमूळे गावातील रस्ते खराब होतील. | **श्री. विनोद खिरोळकर,** निवासी उप-जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष पर्यावरण विषंयक जाहीर लोकसूनावणी यांनी सांगितले की, आपल्या प्रश्नांची नोंद येथे घेण्यात आलेली असून ते DMF च्या मिटींग मध्ये घेण्यात येतील परंतू सदरची लोकसुनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे आपण पर्यावरण विषयक मुद्दे असतील तर ते मांडावे<br><br>**पुढे यावर श्री. दिपक बनसोड,** समन्वयक, पर्यावरण विषयक लोकसुनावणी यांनी सांगितले की, सदर |

| | | |
|---|---|---|
| | यामूळे सदर वाळू लिलाव होवू नये अशी विनंती केली व याबाबत आम्ही ग्रामपंचायत मार्फत नकारार्थी ठराव देखील सादर केलेला आहे. | पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी विषयी अजूनही आपले काही म्हणणे असेल किंवा लेखी निवदने असतील तर ते देण्यात यावे. सदर निवेदन इतिवृत्तात नोंद घेवून पूढे सादर करण्यात येतील. |
| २. | **श्री. बाळू बोरगे, रा. बाबुगांव, ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर** यांनी सांगितले की, सदर वाळू घाटाच्या लिलावासाठी ग्रामपंचायत कार्यालयाने गावक-यांच्या सहमतीने ठराव दिला पाहीजे. सद्यस्थितीत गावामध्ये एवढी बिकट परिस्थिती निर्माण झालेली आहे. सदर वाळू उपसामूळे नदीपात्रातील पाणी कमी झालेले आहे. पाण्याची पातळी कमी होण्याची शक्यता आहे. गावामधून जवळपास २०० ते ३०० वाळू वाहतूक होत असते. आमचे म्हणणे आहे की, सदर वाळूचा लिलाव बंदच व्हायला पाहीजे, परंतू ते शक्य नाही. सदर वाळूचा लिलाव झाला तर वाळू उपसा कमी प्रमाणात यावा, तसेच नियमाप्रमाणे वाळूची वाहतूक झाली पाहीजे. ज्यांनी नियमांचे पालन केले नाही त्यांना नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येवून दंड आकारण्यात यावा. | **श्री. दिपक बनसोड, समन्वयक, पर्यावरण विषयक लोकसुनावणी** यांनी सांगितले की, आपल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

श्री. विनोद खिरोळकर, निवासी उप-जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना संबोधित केले की, आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली, असे जाहीर केले.

**दिपक बनसोड**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि. मंडळ, छ.संभाजीनगर

**सुजित ढोलम**
(सदस्य)
तथा
प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि. मंडळ, छ.संभाजीनगर

**विनोद खिरोळकर**
(अध्यक्ष)
तथा
निवासी उप-जिल्हाधिकारी,
छ.संभाजीनगर